अंक - ७ वा

दिनांक :-
१५ फेब्रुवारी २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# ऑनलाईन शॉपिंग आणि फ्रॉड!




ऑनलाइन शॉपिंग म्हणजे खरेदीसाठी एक सामान्य बाब आहे. अगदी कपड्यांपासून कॉस्मेटिक्स पर्यंत आणि किराणा मालापासून क्रीडासाहित्य पर्यंत सारे काही आज-काल ऑनलाईन खरेदी करण्यासाठी प्राधान्य देतात. ऑनलाइन शॉपिंग करण्यासाठी देण्यात आलेल्या ऑफर आणि मार्केटमध्ये मिळणाऱ्या वस्तूंच्या रकमेपेक्षा कमी किंमत असल्यामुळे ऑनलाइन शॉपिंग ला पसंती मिळाली आणि त्यातल्या त्यात covid-19 च्या महामारी मध्ये Physical Contact टाळण्याकरिता सर्व काही ऑनलाईन पद्धतीने खरेदी चालू असते.

**पण सावधान काही बनावटी वेबसाईटने अनेक लोकांचे खिसे कापले आहेत.**
**चला आजच्या अंकात जाणून घेऊया काय आहे ऑनलाईन शॉपिंग फ्रॉड....!**

# बनावटी शॉपिंग वेबसाईटच्या माध्यमातून 32 वर्षीय तरुणाने 22,000 लोकांची फसवणूक केली!




पोलिसांनी गुजरात मधील सॉफ्टवेअर इंजिनियर असलेल्या एका कपड्यांचा व्यापार करणाऱ्या तरुणाला अटक केली आहे. हा तरुण 32 वर्षीय आहे. याने आयटी क्षेत्रात लंडनमध्ये उच्चशिक्षण पूर्ण करून भारतामध्ये त्याने कपड्यांचा व्यापार चालू केला आणि हे करत असतानाच तो गुन्हेगारीच्या दुनियेकडे वळला. या माध्यमातून त्याने **तब्बल 22,000 लोकांची फसववणूक** केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी त्याला अटक केली व त्यांच्यावर माहिती तंत्रज्ञान आणि आयपीसी च्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला गेला आहे.

# जाणून घ्या काय आहे हे प्रकरण?




- **अगदी कमी किमतीत महागड्या कपड्यांची ऑफर जाहीर केली:**
  या तरुणाने **Shoppee.com** ची बनावटी वेबसाईट बनवून उच्च दर्जाचे कपडे अगदी वाजवी किमतीमध्ये विक्रीस ठेवले आणि भोळ्या ग्राहकांना फसवण्यासाठी गळ टाकला. कॅश ऑन डिलिव्हरी चा पर्याय नसल्याने ग्राहकांना ऑनलाइन पैसे पे करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता आणि पैसे प्राप्त झाल्यानंतरही तो ग्राहकांना डिलिव्हरी द्यायचा नाही.

- **हजारो लोकांना फसवून त्यांना 70 लाख रुपयांना लुटले:**
  बनावटी ऑनलाइन शॉपिंग वेबसाईटवर गुंतवलेली रक्कम कमी असल्याने ग्राहकांनी या प्रकरणात पोलिसांकडे याची तक्रार दिली नाही किंवा जातीने लक्ष घातले नाही. परंतु एका महिलेने 2400 रुपयांची शॉपिंग केली पण तिला पैसे देऊन सुद्धा आपली फसवणूक झाली ते लक्षात येताच तिने पोलिसांकडे याबाबत तक्रार केली. दिलेल्या अहवालानुसार असे निष्पन्न झाले की, या तरुणाने ने एकूण 22 हजार ग्राहकांना 70 लाख रुपयांना लुबाडले आहे या फसवणुकीच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक तर केलेच शिवाय त्याची बनावट वेबसाईटला बंद केले.

# आवाहन

## या पार्श्वभूमीवर सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड यांचे नागरिकांना आवाहन

सोशल मीडियावर अशा प्रकारच्या बनावटी ऑनलाईन शॉपिंग वेबसाईट बऱ्याच आहेत. जवळपास सर्वच वेबसाईट चे कार्य सारखेच आहे. महागड्या वस्तूंना अगदी कमी किमतीत किंवा वाजवी किमतीची ऑफर देऊन नागरिकांना फसवण्याचा डाव आखलेला असतो आणि हे रोखण्यासाठी खालील बाबींची सावधानता बाळगणे आवश्यक आहे,

- शक्यतो विश्वासार्ह वेबसाईटवरूनच खरेदी करावी किंवा वेबसाईट सुरक्षित असल्याची खात्री करावी.
- ज्या संकेतस्थाळावरून शॉपिंग करतोय ती सुरक्षित असल्याची खात्री करावी.
- आपणास नवीन असलेल्या शॉपिंग साईटबद्दल रिव्ह्यू चेक करावेत. रिव्ह्यू वाचून आपली फसवणूक टाळली जाऊ शकते.
- कोणत्याही व्यापारी संस्था विक्रेत्यांकडून सूट च्या नावाने येणाऱ्या बेकायदेशीर ई-मेलला, संदेश किंवा कॉल ला प्रतिसाद देऊ नका, त्यापासून सावध राहा.
- खरेदी करण्यापूर्वी कोणत्याही वेबसाईट ची एक्सचेंजबाबत किंवा रिफंड बाबत काय अटी व नियम लागू आहेत किंवा काय व्यापारी धोरण लागू आहे याची खात्री करा.
- आपली वैयक्तिक माहिती पॉप-अप नोटिफिकेशन मध्ये स्क्रीनवर येऊ देऊ नका.
- आपला पासवर्ड कुणालाही शेअर करू नका.
- पासवर्ड मध्ये आपले नाव वापरू नका.
- ठराविक वापरानंतर पासवर्ड बदला.

# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**

**Contact No.- 020- 27350939**